REGISTERED No. B 3434.

डोंगरे यांच्या बालामृतानें अशक्त मुलें सशक्त होतात

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १३ पुणें, बुधवार तारीख २७ ऑगस्ट १९४७ अंक ३५


## दि रत्नाकर बँक लिमिटेड.

ऑफिसें:—१ कोल्हापूर, २ शाहुपुरी, ३ सांगली, ४ मिरज, ५ जयसिंगपूर.

चेअरमनः—नामदार बी. बी. पाटील, बी. ए, एलएल. बी., डेव्हलपमेंट मिनिस्टर, सांगली स्टेट.

| | रु. |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | २०,१२,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ६,२७,२०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ३,१३,६०० |
| खेळतें भांडवल अंदाजें | ३५,००,००० |

—: अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात. :—

एल्. एन्. शहा,
बी. कॉम., सी.ए. आय. आय. बी.
मॅनेजर

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या
केंद्रस्थानीं असलेली

## शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )
स्थापना १९११

—मुख्य कचेरी—
सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरियल बिल्डिंग
९, बेक हाऊस लेन, कोट, मुंबई.

शाखा ५०

खेळतें भांडवल रु. ७,३१,००,०००

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात
आणि
इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

—पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिसकडे लिहा—

व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.

—सुरवातीच्या—
अवघ्या ४ महिन्यांत कंपनीनें ५ लाखाचें वर काम मिळविलें.

## कॉन्टिनेन्टल म्यूच्युअल विमा कंपनी लिमिटेड, मुंबई

या प्रगतिमान कंपनींत आपला विमा उतरून आपलें जीवन निर्वेध करा.

ठिकठिकाणीं अत्यंत सवलतीच्या अटीवर एजन्सीज व स्पेशल एजन्सीज देणें आहेत. खालील पत्त्यावर पत्र-व्यवहार करावा.

कृ. गो. परोपकारी
मॅनेजिंग डायरेक्टर
६५, सरस्वती विलास, लक्ष्मी रोड, पुणें २



## सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

[स्थापना १९१८]सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई
टे. नं. ३१६७५ ३१-५-१९४७

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | | रु. ४,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. ३,९७,३४० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स् | ... | रु. १,०४,००० |
| ठेवी | ... | रु. ६९,७३,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ७६,७५,००० |

स्पेशल सेव्हिंग्ज डिपॉझिट स्कीम
व्याज : २ टक्के
बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.

—विशेष माहितीसाठी लिहा अगर भेटा -

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्. चेअरमन | एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्. सेक्रेटरी

सब-ऑफिस : दादर, ( बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर )

## विविध माहिती

**मद्रास प्रांतांतील पाणीपुरवठा**—मद्रास प्रांतांतील शहरांचा व खेड्यांचा पाणीपुरवठा सुधारण्यासाठी मद्रास सरकारनें १ कोटी रुपये खर्च करण्याचें ठरविलें आहे. पाणीपुरवठा वाढल्यावर शहरांतील सांडपाण्याचीं गटारेंही सुधारण्यांत येणार आहेत. ह्या कामांसाठी प्राथमिक खर्चाशिवाय दरवर्षी १५ लाख रुपये खर्च करण्यांत यावयाचे आहेत.

**खैरगड संस्थानांत गोवधाला बंदी**—शेठ रामकृष्ण दालमिया ह्यांच्या विनंतीस मान देऊन खैरगड संस्थानच्या अधिपतींनीं १५ ऑगस्ट, १९४७ पासून संस्थानच्या हद्दींत गोवधाला बंदी करणारें फर्मान काढलें आहे.

**अणुशक्तीला पडलेला नवा बळी**—अमेरिकेंतील ओकरिज ह्या ॲटम बाँबच्या कारखान्यांत काम करणारा एक गृहस्थ नुकताच मरण पावला. हा गृहस्थ सुमारें सहा महिन्यांपूर्वी आजारी पडला. त्याच्या शरीरांतून 'गॅमा' किरण बाहेर पडत होते असा तज्ज्ञांचा अभिप्राय आहे. अमेरिकेंत अणुशक्तीच्या चमत्कारिक परिणामानें घडवून आणलेला हा पहिलाच मृत्यू आहे.

**रशिआ-इराण संयुक्त तेल-कंपनी**—१९४६ सालीं रशिआ आणि इराण ह्यांच्या दरम्यान तेलासंबंधीं झालेल्या तहाप्रमाणें इराणमधील रशिअन वकिलानें उभय राष्ट्रांच्या संयुक्त-मालकीच्या तेल कंपनीचा करार इराणला सादर केला आहे. करारांतील शर्तीप्रमाणें कंपनीचें आयुर्मान ५० वर्षांचें असून रशिअनें यंत्रसामुग्री व चालू खर्च ह्यांची तरतूद करावयाची आहे. इराणला नफ्यांत वाटा व जमिनीची मालकी देण्यांत आली आहे.

**ऐन जिनसी विनिमय**—शांघायमधील व्यापाऱ्यांनीं चिनी सरकारच्या आर्थिक खात्याकडे हिंदुस्थान-चीन व्यापारासंबंधीं एक योजना धाडली आहे. ह्या योजनेंत हिंदुस्थानांतून चीनमध्यें कापसाच्या २ लाख गांठी आयात करण्यांत याव्या आणि बदली चीनमधून साखर, मीठ आणि कापड हिंदुस्थानाकडे धाडण्यांत यावें, असें सुचविण्यांत आलें आहे.

**सिंध हैद्राबादेंत कागदाची गिरणी**—ऑस्ट्रिआ व स्वीडन येथें जाऊन आलेले एक हिंदी उद्योगपती सिंध-हैद्राबादमध्यें कागदाची एक गिरणी काढण्याच्या प्रयत्नांत आहेत. गिरणी उभी राहिल्यावर रोज १०० टन कागद तयार होईल. ह्या धंद्यासाठी सुमारें ३ कोटी रुपये भांडवलाची गरज आहे. गोवधबंदीच्या चळवळीमुळें कानपुरांतील कातड्याचे कांहीं कारखाने बंद पडणार असून पाकिस्तान सरकार कातड्याच्या कारखान्यांना आपल्या राज्यांत मदत देण्यास तयार असल्याचीहि वार्ता आहे.

**दक्षिण हैद्राबादेंत लोकरीच्या गिरण्या**—हैद्राबाद संस्थानच्या सरकारनें संस्थानांतील लोकरीचें कापड विणणाऱ्या धंद्याचा विस्तार करण्याचें ठरविलें आहे. विस्ताराच्या योजनेसाठी ८२,५८,८०० रुपये भांडवल लागणार आहे. योजनेंतील एक भाग म्हणून वारंगळ आणि यादगीर येथें लोकर विणण्याचीं नवीन यंत्रें बसविण्यांत आलीं आहेत.

**सिंध प्रांतासाठी बँकिंगचा सल्लागार**—सिंध सरकारनें इजिप्तमधील नमुन्याप्रमाणें एक शेती-सहकारी बँक स्थापण्याचें ठरविलें असून त्यासाठी मि. होडिंग्टन नांवाच्या एका ब्रिटिश तज्ज्ञाची दरमहा ३ हजार रुपयांवर ५ वर्षांसाठी नेमणूक केली आहे.

**ऑस्ट्रेलिआंत बँकांचें राष्ट्रीयीकरण**—सहकारी बँका सोडून इतर बँकांचें राष्ट्रीयीकरण करण्याचा कायदा ऑस्ट्रेलिआचे मुख्य प्रधान मि. चीफ्ले हे तयार करून ऑस्ट्रेलिआच्या फेडरल मजूर पक्षाला सादर करणार आहेत. ह्या कायद्यांत भागीदार, ठेवीदार, ऋणको आणि बँकांतील नोकरवर्ग यांच्या हितसंबंधांच्या संरक्षणाची तरतूद करण्यांत येणार आहे, असें समजतें.

**गिरणी कामगारांना 'स्वातंत्र्य' बोनस**—मुंबई गिरणी-कामगारांना 'स्वातंत्र्य' बोनस देण्याचें मुंबई गिरणी मालक संघानें ठरविलें आहे. १ जानेवारी, १९४७ ते ३१ ऑगस्ट, १९४७ ह्या मुदतीमध्यें कामगारांना जितकें एकूण मूळ वेतन (भत्ते वगळून) मिळालें असेल, त्याच्या एक अष्टमांशाइतकें बोनस दिलें जाईल. ता. २३ ऑक्टोबर, १९४७ रोजीं बोनसची रकम कामगारांच्या प्रत्यक्ष हातीं पडेल.

**कारखान्यांत फराळगृहें**—२५० पेक्षा जास्त कामगार असलेल्या कारखान्यांतून कामगारांसाठी फराळगृहें चालविण्यांत आलींच पाहिजेत, अशी सक्ती मद्रास सरकार करणार आहे. मालक आणि कामगार ह्यांच्या प्रतिनिधींच्या जोड व्यवस्था मंडळानें फराळगृहाची व्यवस्था पहावयाची आहे.

**पाकिस्तानमधील राजधान्यांचें दळणवळण**—पाकिस्तानची मध्यवर्ती राजधानी कराची ही केटा, लाहोर, पेशावर आणि ढाका ह्या प्रांतिक राजधान्यांस विमानमार्गे जोडण्याची योजना तात्काळ हातीं घेण्यांत आली आहे.

**कामगारांना यांत्रिक हालचालींची माहिती**—रेल्वेकामगारांना यंत्रांची माहिती चित्रपटांचे द्वारां देण्याची एक योजना रेल्वे बोर्डानें मंजूर केली आहे. यंत्रांच्या हालचालींचें कामगारांना ज्ञान झालें म्हणजे अपघात कमी होतील, अशी अपेक्षा आहे.

**मद्रास प्रांतांतील उद्योगधंदे**—मद्रास प्रांतांतील उद्योगधंद्यांना मदत करण्याच्या उद्देशानें मद्रास सरकारनें १ कोटी रुपये भांडवल असणारी एक इंडस्ट्रिअल व फायनॅन्स कॉर्पोरेशन काढण्याचें ठरविलें आहे. ह्याशिवाय, नवीन उद्योगधंद्यांना दीर्घ व अल्प मुदतीचीं कर्जें देण्याचाही सरकारचा विचार आहे. कॉर्पोरेशनचे ५० टक्के भाग सरकार घेणार असल्यानें संस्थेवर सरकारचें नियंत्रण राहूं शकेल. उरलेले भाग बँका, विमा कंपन्या, पैसे गुंतविणाऱ्या धंदेवाईक कंपन्या व सहकारी संस्था ह्यांना देण्यांत येणार आहेत.

**म्हैसूरचा नवीन विमानतळ**—म्हैसूरजवळ एक-दोन वर्षांच्या आंतच एक पहिल्या प्रतीचा विमानतळ बांधून तयार होईल. विमानगृहाचें आणि विमानांच्या उड्डाणासाठी लागणाऱ्या रस्त्याचें काम चालू झालें आहे. विमानतळाला कित्येक लाख रुपये खर्च येणार असून तो तयार झाल्यावर प्रचंड विमानेंही त्यावर उतरूं शकतील.

**सुताच्या आयातीवरील जकात**—अखिल भारतीय चरखा संघानें विनंती केल्यामुळें हैद्राबाद संस्थानांत आयात होणाऱ्या सुतावरील जकात निजाम सरकारनें दोन वर्षांपुरती रद्द केली आहे, असें समजतें. संस्थानांतील विणकऱ्यांच्या धंद्याला उत्तेजन द्यावें ह्या हेतूनें ही तात्पुरती माफी देण्यांत आली आहे.

**बिहार सरकारची योजना**—बिहार सरकारनें प्रांतांतील पाणी पुरवठा व वीजपुरवठा वाढविण्यासाठी एक पंचवार्षिक कार्यक्रम आखला आहे. ह्या योजनेंत निरनिराळ्या ११४ लहान-मोठ्या कामांचा समावेश केलेला असून त्यासाठीं खर्च सुमारें १ ते १½ कोटी रुपये येईल. योजना अंमलांत आल्यावर शेतीचें उत्पन्न वाढून प्रांताच्या औद्योगीकरणालाही मदत होईल.

# अर्थ

बुधवार, ता. २७ ऑगस्ट, १९४७




प्रो. वा. गो. काळे


संपादक :

श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## हिंदुस्थानच्या पौंडी शिलकाबाबत तात्पुरता करार

### अर्थमंत्री, श्री. चेट्टी, ह्यांचें आश्वासन

हिंदुस्थानाचें ग्रेट ब्रिटनमध्यें जें येणें साठलें आहे, त्याबाबत तात्पुरता एक करार करण्यासाठीं लंडन येथें वाटाघाटी चालू होत्या, त्या पुऱ्या होऊन ता. १४ ऑगस्ट रोजीं करारावर उभय सरकारांतर्फे सह्याहि झाल्या. ब्रिटिश सरकारतर्फे सर विल्फ्रेड एडी ह्यांची सही असून श्री. व्ही. नरहरिराव ह्यांनीं हिंदुस्थानतर्फे सही केली आहे. प्रस्तुत करारासाठी, रिझर्व्ह बँकेची स्टर्लिंगमधील शिल्लक ११६ कोटि पौंड धरण्यांत आली आहे. रिझर्व्ह बँकेनें बँक ऑफ इंग्लंडमध्यें एक नवें खातें ( खातें नं. २ ) उघडून त्यांत हे ११६ कोटि पौंड वर्ग करावयाचे आहेत. ह्या खात्याचा व्यवहार हिंद–ब्रिटन कराराच्या ६ व्या कलमानुसार चालविला जाईल. रिझर्व्ह बँक ही बँक ऑफ इंग्लंडमध्यें आणखी एक नवें खातें ( खातें नं. १ ) उघडील आणि त्यांत, कराराच्या तारखेनंतर मिळणारें स्टर्लिंग वर्ग केलें जाईल. त्याचप्रमाणें, नं २ खात्यांतील रकमाहि कराराप्रमाणें त्यांत वर्ग होऊं शकतील.

वरील नं १ खात्यांत जेवढें स्टर्लिंग शिल्लक असेल, त्याचा चालू देणें भागविण्यासाठी कसाहि उपयोग करण्यास हिंदुस्थानास मुभा आहे. नं. २ खात्यांतून नं. १ खात्यांत ३½ कोटी पौंड तावडतोब वर्ग केले जातील. हिंदुस्थानास स्वतःचें परदेशांतील देणें भागविण्यासाठी तात्कालिक तूट येऊं नये, या करितां ३ कोटी पौंड एवढी आणखी रकम नं २ खात्यांत वर्ग करण्यांत येईल. प्रस्तुत योजना १४ ऑगस्ट रोजीं अंमलांत आली आणि ३१ डिसेंबर १९४७ अखेर ती चालू रहावयाची आहे. १९४७ संपण्याच्या आंत पुनः वाटाघाटी होतील आणि चालू योजना आणखी कांहीं काल अंमलांत ठेवावयाची, का नवी योजना करावयाची हें त्यांत ठरविलें जाईल. वर सांगितलेली ३ कोटी पौंडांची रकम चालू खातें म्हणून वापरली जाईल आणि त्या खात्यांतील शिल्लक रकमांची पातळी नव्या वाटाघाटींत विचारांत घेण्यांत येईल.

एका बाजूस हिंदुस्थान आणि दुसऱ्या बाजूस स्टर्लिंग गटांतील इतर देश ह्यांचेमध्यें ब्रिटन व हिंदुस्थान ह्यांनीं चालून दिलेल्या धोरणानुसार भांडवलाची आवक–जावक कशी होत आहे, हें दोन्ही देशांच्या मध्यवर्ती बँका ठराविक कालांतरानें वरचेवर तपासतील. हिंदुस्थानांतून इतर स्टर्लिंग देशांकडे जेवढी निवळ जावक झाली असेल, तेवढी रकम नं. २ खात्यांतून नं. १ खात्यांत वर्ग केली जाईल आणि हिंदुस्थानांत जेवढी आवक झाली असेल, तेवढी नं. १ खात्यांतून नं. २ खात्यांत वर्ग केली जाईल. हिंद–ब्रिटन कराराच्या प्रत्यक्ष अमलबजावणींत अडचणी येऊं नयेत ह्यासाठी दोन्ही देशांनीं जरूर तेव्हां, वारंवार, एकमेकांशीं चर्चा करावयाची आहे. प्रस्तुत करार १४ ऑगस्ट रोजीं झाला असल्याकारणानें, १५ ऑगस्ट रोजीं किंवा त्यानंतर झालेल्या घडामोडींचेबाबत, "हिंदुस्थान सरकार" ह्याचा अर्थ दोन्हीं नवीं सरकारें किंवा जरूरीप्रमाणें त्यापैकी कोणतेंहि सरकार, असाच केला जाईल आणि "हिंदुस्थान" ह्या शब्दामध्यें १५ ऑगस्टपूर्वीचा हिंदुस्थानच गृहीत धरण्यांत येईल. "स्टर्लिंग गट" ह्याचा अर्थ ग्रेट ब्रिटनमध्यें अमलांत असलेल्या एक्सचेंज कंट्रोल रेग्युलेशान्सनें केलेला आहेच.

१४ ऑगस्टच्या, स्टर्लिंगबाबतच्या हिंद–ब्रिटन कराराच्या वरील तपशीलावरून कराराचा बोध होण्यास सहाय्य होईल. परंतु वर उल्लेख केलेलें खातें नं. १ व खातें नं. २ ह्यांतील शिलकांच्या ज्या रकमा सांगितल्या आहेत त्यांतून वजा घालण्याच्या आणि त्यांत भर घालण्याच्या कित्येक बाबी करारांत आहेत. त्या कारणानें, प्रत्यक्ष उपलब्ध रकमांचे आकडे आज स्पष्ट करणें शक्य नाहीं.

ब्रिटिश सरकारनें स्टर्लिंगचें डॉलर्समधील रूपांतर होण्यास बंदी करणारा हुकूम नुकताच काढला, त्यामुळें हिंद–ब्रिटन करारास बाध येणार नाहीं, असा खुलासा आपले नवे अर्थमंत्री श्री. षण्मुखम् चेट्टी ह्यांनीं केला आहे. "ब्रिटनच्या अडचणी आम्ही जाणतो आणि त्याविषयीं आम्हांस सहानुभूति आहे. परंतु, आमच्या अडचणींचीहि जाणीव ब्रिटननें ठेवली पाहिजे; कारण हिंदी रहाणीचा दर्जा इतका कनिष्ठ आहे, कीं ज्यास्त त्यागास आम्हांस वावच उरलेला नाहीं" असें अर्थमंत्र्यांनीं सांगितलें आहे. त्याचप्रमाणें, ब्रिटिश पौंडास बळकटी आणण्याचा ब्रिटनचा प्रयत्न चालू आहे आणि आपलें स्टर्लिंग पौंडांत फार मोठें येणें अडकलेलें असल्याकारणानें, पौंडास मजबुती येणें आपल्या हिताचेंच आहे, ह्या त्यांच्या उद्गारावरून हिंदी सरकारच्या धोरणाचा खुलासा होईल. हिंदुस्थान सरकारनें आयातीवर कडक नियंत्रणें अगोदरच बसविलेलीं आहेत आणि अन्नाच्या आयातीस कोणत्याहि प्रकारें बाध येऊं नये ह्यासाठी हिंदुस्थान सरकार आवश्यक ते सर्व उपाय चालू ठेवणार आहे. वर निर्दिष्ट केलेल्या ३½+३=६½ कोटि पौंडांची वाटणी हिंदुस्थान व पाकिस्तान ह्यांचेमध्यें अद्याप व्हावयाची आहे.

---

**श्री. दा. वा. पोतदार ह्यांची निवड**—अर्बन बँकांतर्फे मुंबई प्रां. सहकारी बँकेचे डायरेक्टर बोर्डावर निवडून द्यावयाच्या डायरेक्टराचे जागीं श्री. दा. वा. पोतदार ह्यांची फेरनिवड झाली आहे. त्यांना ४४ मतांपैकी २९ मतें मिळालीं.

**ब्रिटिश खाणी कामगारांचा पुनः सहा दिवसांचा आठवडा**—ब्रिटिश खाणीकामगार पांच दिवसांच्या कामाच्या आठवड्यासाठीं चाळीस वर्षे झटत होते. हें ध्येय त्यांना साध्य झालें, तरी सरकारला मदत म्हणून ते प्रत्येक आठवड्यांत पुनः सहा दिवस काम करूं लागणार आहेत. सप्टेंबर १९४७ ते मे १९४८ अखेर ते दर शनिवारीं घरीं न बसतां ७½ तास काम करतील.

**बॉंबे इलेक्ट्रिक सप्लाय अँड ट्राम्वे कं. लि.**—वरील कंपनीची मालकी ता. ७ रोजीं मुंबई शहर म्युनिसिपालिटीकडे गेली. आतां तिची व्यवस्था सर पुरुषोत्तमदास ठाकूरदास ह्यांच्या अध्यक्षत्वाखालील एका कमिटीकडे सोंपविण्यांत आली आहे.

# स्फुट विचार

### मॉस्को येथें पहिली हिंदी वकिलात

स्वतंत्र हिंदुस्थानच्या वसाहतीच्या राज्याचा वकील ह्या नात्यानें श्रीमती विजयालक्ष्मी पंडित या नुकत्याच मास्कोला दाखल झाल्या आहेत. हिंदुस्थान आणि रशिया ह्यांचे आजवरचे राजनैतिक संबंध ब्रिटनच्या मार्फत आणि म्हणूनच ब्रिटनच्या तंत्रानें रहात असत. यापुढें तशी परिस्थिती रहाणार नसून हिंदुस्थान आणि रशिआ ह्यांच्यांतील त्रयस्थ नाहींसा झाल्यामुळें परस्परांची परस्परांना अधिक चांगली माहिती होईल. ह्याच सुमारास रशियाशीं व्यापारी संबंध जोडण्याचेही प्रयत्न होत आहेत, हीही गोष्ट महत्त्वाची आहे. हिंदुस्थानच्या इतर देशांतील वकिलातींपेक्षा रशिआंतील वकिलातीला अधिक महत्त्व आहे. जागतिक राजकारणांतील सत्त-संपादनाच्या स्पर्धेत हिंदुस्थाननें कोठली बाजू घ्यावी हा निर्णय परिस्थिती-सापेक्ष राहील व रहावा. पण औद्योगिक विकासापुरतें निदान कांहीं बाबतींत तरी रशिआकडून हिंदुस्थानला पुष्कळ शिकण्यासारखें आहे. पहिल्या महायुद्धानंतर अवघ्या २५ वर्षांत रशिआनें जी औद्योगिक उन्नति करून घेतली तिचें रहस्य हिंदी सरकारनें समजून घेणें आवश्यक आहे. हिंदुस्थानची आर्थिक उन्नति साधण्यासाठीं रशिआनें उपयोगांत आणलेले उपाय तंतोतंत अमलांत आणले पाहिजेत असें मानण्याचें कारण नाहीं. तथापि आर्थिक उत्पादनांत भाग घेणाऱ्या घटकांची घातक स्पर्धा थांबवून सहकार्यानें धनोत्पादन करण्याचें तत्त्व हिंदी अर्थव्यवस्थेंत अंमलांत आणणें अपरिहार्य झालेलें आहे. हिंदुस्थानांतील शेतीचें व उद्योगधंद्यांचें उत्पादन झपाट्यानें वाढविल्याशिवाय वाढत्या लोकसंख्येचें भवितव्य चांगलें नाहीं ही गोष्ट आतां सर्वमान्य झालेली आहे.

### जनरल स्मट्स आणि संयुक्त राष्ट्रसंघ

दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी नागरिकांना त्या देशांत ज्या अन्याय्य रीतीनें वागविण्यांत येतें त्याबद्दल संयुक्त राष्ट्र-संघाच्या जनरल ॲसेंब्लीनें गेल्या वर्षीच्या डिसेंबरमध्यें एक ठराव मंजूर केला होता. ह्या ठरावान्वयें दक्षिण आफ्रिकेच्या आणि हिंदुस्थानच्या सरकारांना ह्या प्रकरणीं पुन्हा वाटाघाटी व बोलणीं चालू करण्याची विनंति करण्यांत आली होती. ॲसेंब्लीच्या ह्या ठरावाप्रमाणें बोलणीं सुरू करण्यासहि फील्ड मार्शल स्मट्स ह्यांनीं नकार दिला आहे. हिंदी नागरिकांचे विरुद्ध अन्याय्य कायदे करून वर फिल्ड मार्शल स्मट्स ह्यांनीं हिंदुस्थानच दक्षिण आफ्रिकेशीं वैरभावानें वागत आहे असा कांगावा केला आहे. संयुक्त राष्ट्रसंघाला ह्या बाबतींत दक्षिण आफ्रिकेच्या कारभारांत हस्तक्षेप करता येणार नाहीं. कारण, हिंदी रहिवाशांना दक्षिण आफ्रिकेंत मिळणाऱ्या वागणुकीमुळें जागतिक शांततेला धक्का पोचतो असें म्हणतां येत नाहीं. फील्ड मार्शल स्मट्स यांचीं वर्णद्वेषांनीं प्रेरित झालेलीं भाषणें व उद्गार लक्षांत घेतां संयुक्त राष्ट्रसंघाच्या ठरावाला त्यांनीं कस्पटाप्रमाणें लेखावें ह्यांत नवल नाहीं. त्यांच्या राजकीय मताची बरोबर कल्पना असल्यानेंच हिंदुस्थान सरकारला आपला हाय कमिशनर परत बोलवावा लागला आणि आर्थिक दंडयोजनेचा मार्ग स्वीकारावा लागला. नैऋत्य आफ्रिका संयुक्त राष्ट्र संघटनेच्या विश्वस्तांकडे देण्यांत यावी हा ठरावही फील्ड मार्शल स्मट्स ह्यांनीं धुडाकाऊन लावला आहे. पहिल्या महायुद्धानंतर स्थापन झालेल्या व महत्त्वाच्या बाबतींत निरुपयोगी ठरलेल्या राष्ट्रसंघातर्फे नैऋत्य आफ्रिकेचा वारसा दक्षिण आफ्रिकेकडे आला. तो राष्ट्रसंघच आतां विसर्जन पावला असतांना नैऋत्य आफ्रिका आपल्या नियंत्रणाखालीं ठेवण्याचा ज. स्मट्स ह्यांचा आग्रह अप्रयोजक आणि वस्तुस्थितीला सोडून आहे असें म्हणावें लागतें.

### गिरणी कामगारांच्या वेतनांत एकवाक्यता

कपास कापडाच्या गिरण्यांत काम करणाऱ्या सर्व कामगारांस देण्यांत यावयाच्या वेतनामध्यें एकवाक्यता असावी, ह्या दृष्टीनें हिंदुस्थान सरकारनें योजना सुरू केली आहे. मुंबई शहरांतील गिरण्यांमधील प्रत्येक कामगारास मासिक किमान ३० रु. वेतन मिळतें. १९३९ मधील रहाणीच्या खर्चाचे मानाशीं तुलना करून तिचे आधारावर ही रक्कम ठरविण्यांत आलेली आहे. महागाईभत्ता दिला जातो तो वेगळा. अहमदाबाद आणि इंदूर येथेंहि अशाच प्रकारची पद्धति अंमलांत आहे. तेव्हां, इतर केंद्रांतहि ती सुरू करणें क्रमप्राप्तच आहे, असें हिंदुस्थान सरकारचें म्हणणें आहे. हिंदुस्थानांतील कोणत्याहि गिरणी कामगारास ३० रु. किमान वेतन मिळावें, असें प्रतिपादन केलें जात आहे. परंतु मोठीं शहरें आणि लहान गांवें येथील रहाणीचा खर्च सारखा असणें शक्य नसल्यानें किमान वेतन व महागाई भत्ता हीं निश्चित करतांना स्थानिक परिस्थिति विचारांत घ्यावी लागेल. नोव्हेंबरमध्यें कॉटन टेक्स्टाइल इंडस्ट्रिअल कमिटीची बैठक भरणार आहे तिचेमध्यें ह्या प्रश्नाचा विचार केला जाईलच; परंतु प्रांतिक सरकारांनीं त्याची वाट न पहातां आतांच ह्यासंबंधांत पुढें पाऊल टाकावें, अशी मध्यवर्ती सरकारची शिफारस आहे.

### विपन्नावस्थेंतील आमदारांच्या मदतीसाठीं फंड

ब्रिटिश कॉमन्स सभेचे जे माजी सभासद किंवा त्यांच्या विधवा स्त्रिया आपत्तींत असतील, त्यांना मदत करण्यासाठीं १९३१ सालीं एक फंड काढण्यांत आला. कॉमन्स सभेचा प्रत्येक सभासद ह्या फंडास दरसाल १२ पौंड वर्गणी देतो. अशा रीतीनें प्रतिवर्षी ७,६५० पौंड जमतात. फंडामध्यें सध्या ४५,००० पौंड शिल्लक असून फंडामार्फत २० जणांना मदत मिळत आहे. वैयक्तिक मदतीची वार्षिक कमाल रकम १५० पौंड ठरविण्यांत आलेली आहे; परंतु मदत घेणारास उत्पन्नाचा दुसरा मार्ग असल्यास, त्याचें वार्षिक एकूण उत्पन्न २२५ पौंड होण्यापुरतीच परंतु १५० पौंडापेक्षां ज्यास्त नाहीं, एवढी मदत त्यास दिली जाते. अशा रीतीनें फंडांतून दरसाल २,०४० पौंड दिले जातात. फंडाच्या ट्रस्टींना, मदत देण्याचे बाबत अधिक स्वातंत्र्य असावें, असा प्रयत्न चालू आहे.

### चीनमधील परिस्थितींत सुधारणा नाहीं

चीनमध्यें परदेशी व्यापार थंडावल्यासारखाच आहे. आयातीवर कडक निर्बंध आहेत आणि निर्गत होण्यांतहि अनेक अडचणी आहेत. इंग्लंडहून शांघाईला मोटार पाठविण्यास जितका खर्च येतो, त्यापेक्षा ज्यास्त खर्च ती मोटार उतरवून घेण्यास पडतो, अशा प्रकारची परिस्थिति आहे. ब्रिटिश व्यापारी फर्म्सना धंदा नाहीं म्हणून दरवाजे लावून घ्यावे लागत आहेत, परंतु कालांतरानें सुधारणा होईल ह्या आशेवर ते आहेत. फाजील चलन विस्तारास आळा घालण्याचें चिनी सरकारनें चालविलेले प्रयत्न अयशस्वी झाले आहेत. किंमती भरमसाट वाढून अमेरिकन डॉलरला काळ्या बाजारांत चलती आहे. वहातुकीच्या साधनांत अद्याप सुधारणा नाहीं. कम्युनिस्टांचा प्रश्न राजकीय व आर्थिक मार्गानें सोडविण्याचा निर्धार केलेल्या चिनी सरकारनें अखेर लष्करी मार्गच पत्करला आहे.

**हिंद सायकल्स लि.**—३१ डिसेंबर, १९४६ अखेर संपलेल्या वर्षी वरील कंपनीस ६२,२०९ रु. नफा झाला. डायरेक्टरांच्या विनंतीस अनुसरून मॅनेजिंग एजंटांनीं (मेसर्स बिर्ला ब्रदर्स) मासिक अलावन्स व नफ्याचा हिस्सा हीं घेतलेलीं नाहींत.

**एअर-इंडिया लि. नें पहिल्या पांच महिन्यांत डिव्हिडंड दिलें**—वैमानिक वहातुकीच्या किफायतशिरपणाची कल्पना मेसर्स टाटा सन्स लि. च्या मॅनेजिंग एजन्सीखालील वरील कंपनीच्या वृत्तांतावरून येईल. २८ जुलै, १९४६ रोजीं एअर-इंडिया लि. नोंदण्यांत आली व तिनें टाटा सन्स लि. चें विमान-वहातुक खातें आपल्या ताब्यांत घेतलें. अशा रीतीनें १४ वर्षांचा वैमानिक वहातुकीचा अनुभव आणि टाटांच्या विमानांची लोकप्रियता ह्यांचा फायदा नव्या कंपनीस मिळाला. ३१ डिसेंबर, १९४६ अखेरचा कंपनीचा अहवाल पहातां, ह्या पांच महिन्यांच्या अवधींत तिचें उत्पन्न ४७½ लक्ष रु. भरलें. त्यापैकीं १५ लक्ष रुपये पगार व मजुरी ह्या रूपानें वाटले गेले, बाकीचा खर्च २३ लक्ष रु. झाला आणि ९½ लक्ष रु. ठोक नफा उरला. त्यांतून ४ लक्ष, ६० हजार रुपये घसाऱ्यासाठीं काढून आणि कराची तरतूद करून २ लक्ष, ९७ हजार रु. निव्वळ नफा उरला. भागीदारांना ५% डिव्हिडंड देऊनहि १ लक्ष रु. रिझर्व्ह फंडांत टाकतां आले.

**हिंदुस्थानांतील सरकारी एंजिनिअर्स**—ब्रिटिश हिंदुस्थानांत इंडिअन सर्व्हिस ऑफ एंजिनिअर्स ह्या शाखेंत २०२ एंजिनिअर्स होते. त्यापैकीं १२२ हिंदुस्थानांत रहाणार असून १९ पाकिस्तानांत जाणार आहेत. ६१ एंजिनिअर्स सेवानिवृत्त होणार आहेत.

**इंग्लंडला जाणारांसाठीं**—हिंदी नागरिकांपैकीं (सरकारी नोकर सोडून) ज्यांना १ आक्टोबर १९४७ पासून ते ३० जून १९४८ पर्यंतच्या कालांत इंग्लंडला जावयाचें असेल त्यांनीं आपलीं नांवें ३१ ऑगस्ट १९४७ पूर्वी नोंदविलीं पाहिजेत. प्रवाशांनीं एकाच कंपनकिडे अगर एजंटाकडे नांवें नोंदवावीं. नांव नोंदविण्याच्या वेळीं ३०० रुपये डिपॉझिट ठेवावें लागेल. सबंध कुटुंब जावयाचें असेल, तर ५०० रुपये डिपॉझिट ठेवावें लागेल. अर्जांत (अ) ज्यांच्याकरतां बोटींवर जागा घ्यावयाची असेल त्यांचीं नांवें, पत्ते, वय, स्त्री अगर पुरुष इत्यादि माहिती असावी. (ब) ज्या महिन्यांत प्रवास करावयाचा असेल तो महिना व पहिल्या का दुसऱ्या पंधरवड्यांत प्रवास करणार तें नमूद करावें. (क) कोठल्या वर्गानें प्रवास करणार तें लिहून जागेसाठीं दुसरा अर्ज केला नसल्याचा दाखलाही असावा. इंग्लंडला जाणाऱ्या बोटींवर आणखी वर्षभर तरी जागा अपुऱ्या असल्यामुळें त्यांवर नियंत्रण ठेवणें जरूर झालें आहे.

**हंगेरींतील निवडणुका**—हंगेरींतील नव्या निवडणुका ता. ३१ ऑगस्ट रोजीं होणार असल्याचें हंगेरिअन सरकारतर्फे जाहीर करण्यांत आलें आहे.

---

**" ह्या महिन्यांतल्या आर्थिक घडामोडी "**


वरील विषयावर शुक्रवार ता. २९ ऑगस्ट रोजीं " अर्था "चे संपादक, श्री श्री. वा. काळे, ह्यांचें मुंबई रेडिओ स्टेशनवरून सायंकाळीं ७-३० वाजतां भाषण होणार आहे.


-सर्व प्रांतांतील-
सुती – गरम – रेशमी
--खादीचें माहेरघर--

# खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ,
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २

**पेडणेकर आणि कंपनी लि.,**



शिवणयाच्या यंत्रांचे व्यापारी.
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २२७३८

**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार




# साठे बिस्किटें

**ठराविक पुरवठा नियमितपणें दरमहा होत आहे. आतां माल सांचवून ठेवूं नका.**

प्रचलित सरकारी नियंत्रणामुळें बिस्किटांकरतां लागणारा योग्य तो कच्चा माल मिळणें अशक्य झालें आहे. तथापि त्यांतल्या त्यांत चांगला माल मिळेल तोच वापरण्याचा आमचा सतत प्रयत्न असतोच. तरी व्यापाऱ्यांनीं बिस्किटें जास्त दिवस सांचवून न ठेवतां शक्य तितका ताजा माल ग्राहकांस देण्याची खबरदारी घेणें अधिक चांगलें।

**साठे बिस्किट कंपनी, पुणें १.**

## संयुक्त-प्रांतांत साखरेचे आणखी चार कारखाने

संयुक्त-प्रांत सरकार साखरेच्या चार नव्या कारखान्यांच्या उभारणीस परवानगी देण्याचा विचार करीत आहे असें समजतें. ह्या नव्या कारखान्यांतून रोज ८०० टन ऊस गाळण्याची सोय होणार आहे. संयुक्त प्रांत सरकारचा हा बेत खरा असेल तर त्या संबंधी पुढील मुद्दे विचारांत घेतले जावे असें सुचविण्यांत येत आहे:—(१) संयुक्त प्रांतांत आज चालू असलेले पण आर्थिक दृष्ट्या असमाधानकारक असलेले कारखाने बंद करून त्यांच्या ऐवजीं वरील नवीन कारखाने काढण्यांत येत आहेत काय? तसें असेल तरच नव्या कारखान्यांना परवानगी देणें इष्ट ठरेल. (२) संयुक्त-प्रांत आणि बिहार ह्या दोन प्रांतांतच हिंदुस्थानांतील साखरेच्या १९४ कारखान्यांपैकीं १०३ कारखाने आहेत. तेव्हां उद्योगधंद्यांच्या विकेंद्रीकरणाचे प्रयत्न इतर देशांतून होत असतांना हिंदुस्थानानें मात्र केंद्रीकरणाला उत्तेजन देणें कितपत योग्य ठरेल ह्याचा विचार झाला पाहिजे. (३) संयुक्त-प्रांतांत व बिहारमध्यें साखरेचे इतके कारखाने निघण्याचें कारण दक्षिण हिंदुस्थानांत पाटाच्या पाण्याची सोय नव्हती हें आहे. एरवी ह्या प्रांताचें हवामान उसाच्या लागवडीला योग्य नाहीं. उसाच्या रसापासून अधिक साखर काढण्याच्या प्रयत्नांना मुंबई प्रांतांत अधिक चांगलें यश आलें आहे ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. (४) पोस्ट वॉर शुगर पॅनेल बोर्डानें यापुढें हिंदुस्थानांतील नवीन साखरेचे कारखाने वरील दोन प्रांत सोडून इतरत्र काढण्यांत यावें अशी शिफारस केली आहे. ह्या पॅनेलच्या अहवालाचा विचार करून, आणि देशाची झालेली फाळणी लक्षांत घेऊन, मध्यवर्ती सरकारला यासंबंधी धोरण ठरविण्याला वेळ मिळणें जरूर आहे.

## चलनवाढ आणि वाढत्या किंमती

"टाटा क्वार्टर्ली" च्या ताज्या अंकांत हिंदुस्थानांतील चलनवाढ आणि चढ्या किंमती यांची मीमांसा पुढील प्रमाणें केली आहे. युद्धकालांत नोटांच्या चलनाचा सुकाळ झाला त्यामुळें पैसा आर्थिक व्यवहारांत फार मोठ्या प्रमाणावर खेळूं लागला. पण आतां हें कारण नष्ट झालें असलें, तरी बँका करीत असलेल्या पतीच्या व्यवहारांत वाढ झाली आहे. त्यामुळें पूर्वींचीच परिस्थिति कायम आहे. युद्धकाळांत पैसा छापल्यानें वाढत असला तरी त्यापैकीं बराच व्यवहारांत येत नसे. आतां पैशाच्या पुरवठ्यांत होणारी वाढ बेताची असल्यामुळें पैशाच्या मागणीचा जोर कायम आहे. युद्धकाळांत पैशाचा पुरवठा वाढला पण त्याबरोबर उत्पादनही एकंदरीनें वाढलें. आज मात्र औद्योगिक उत्पादन घटत आहे. शिवाय, नैसर्गिक आपत्ती आणि आंतरराष्ट्रीय घडामोडी ह्यांमुळें पुरवठा घसरत चालला आहे. युद्धकाळीं आर्थिक व्यवहारावरील नियंत्रणें हल्लींपेक्षां अधिक कार्यक्षम होतीं. हल्लीं नियंत्रणें ढिलीं झाल्यानें वस्तूंच्या तुटवड्याचा परिणाम अधिक जाणवत आहे. पगारवाढीच्या प्रवृत्तीमुळें ग्राहकांची खर्चिक वृत्ति वाढत आहे; आणि मजूर वर्ग उत्पादन वाढविण्याविषयीं उदासीन आहे.

**रूरल सहकारी सोसायटीज सेक्रेटरीज रिफ्रेशर वर्ग, पंढरपूर**

ह्या वर्गाचा ता. २८–७–४७ रोजीं श्री. बबनराव बढवे ह्यांचे अध्यक्षतेखालीं उद्‌घाटन समारंभ झाला. हा वर्ग ता. २८–७–४७ ते ७–८–४७ पर्यंत चालविण्यांत आला. वर्ग यशस्वी करण्याचें सर्व श्रेय मुंबई इलाखा सहकारी इन्स्टिट्यूटचे एज्यु. सुपरवायझर मे. देशमुख, पंढरपूर विभागाचे सेंट्रल बँकेचे इन्स्पेक्टर मे. साळुंके, एजंट मे. पाशाळकर व लँड व्हॅल्युएशन ऑफिसर मि. कुलकर्णी यांना आहे. शेवटी चाचणी परीक्षा घेतां शे. ६० विद्यार्थी पास झाले.

**गोदावरीवरील धरण**—दक्षिण हिंदुस्थानांत गोदावरीवरील संकल्पित धरण पूर्ण झाल्यावर मद्रास प्रांतांतील तांदुळाचें उत्पादन १० लाख टनांनी वाढेल असा अंदाज आहे. हें धरण ६ हजार फूट लांब होईल. तें पूर्ण होण्यास १२ वर्षें लागतील व त्यामुळें २३ लाख एकर नवीन जमीन हुकुमी पाणी–पुरवठ्याची होईल. ह्या शिवाय धरणावर १ लक्ष किलोवॅट वीज उत्पन्न करतां येईल.

**हिंदुस्थानसाठी जर्मन यंत्रसामुग्री**—इंटर–अलाइड रिपेरेशन्स एजन्सीनें १५ राष्ट्रांना २३ जर्मन कारखान्यांतील यंत्रसामुग्री नुकसान भरपाई म्हणून देण्याचें ठरविलें आहे. ह्या १५ देशांत हिंदुस्थानचाही नंबर लागला आहे. ज्या जर्मन कारखान्यांतील सामुग्री अशा तऱ्हेनें वाटली जाणार आहे, त्यांत जहाजे बांधण्याचे, रासायनिक उत्पादनाचे आणि मोठमोठीं यंत्रें तयार करण्याचे कारखाने आहेत.


**हिंदुस्थानसाठी अमेरिकन रेल्वे एंजिनें**—कलकत्ता येथील टाटा एंजिनिअरिंग वर्क्स आणि हिंदुस्थान सरकारचे अमेरिकेंतील पुरवठा खातें ह्यांच्या तर्फे १६ रेल्वे एंजिनें फिलॅडेल्फिया येथील बाल्डविन लोकोमोटिव्ह कंपनी कडून मागविण्यांत आलीं होतीं. तीं सर्व एंजिनें पुरीं होत आलीं असून, त्यांपैकीं ४ एंजिनें २३ ऑगस्टला रवाना झालीं. बाकीचीं सप्टेंबरमध्यें रवाना होतील. प्रत्येक एंजिनाची किंमत सुमारे १ लाख डॉलर्स आहे.

**पाकिस्तान रेडिओ केंद्र**—पाकिस्तान रेडिओ केंद्र तूर्त लाहोर येथें असून तेथून उर्दु, पुश्तू, बंगाली व इंग्रजी भाषांतून बातमी सांगितली जाते.


आमचे प्रमुख जाहिरात प्रतिनिधी

**दत्तात्रय रामचंद्र कुलकर्णी**

**९६ नारायण पेठ, पुणें २.**






## रिझर्व्ह बँकेची फाळणी

### पाकिस्तान ( मोनेटरी सिस्टिम अँन्ड रिझर्व्ह बँक ) ऑर्डर १९४७

रिझर्व्ह बँकेच्या जिंदगीची हिंदुस्थान व पाकिस्तान ह्यांत वाटणी कशी करावयाची, ह्याबाबत दोन्ही सरकारांची एकवाक्यता झाली असून पाकिस्तान ( मोनेटरी सिस्टिम अँड रिझर्व्ह बँक ) ऑर्डर, १९४७ मध्यें त्याचा खुलासा करण्यांत आला आहे. वरील हुकूम १९४७ च्या इंडियन इंडिपेन्डन्स अॅक्टच्या ९ व्या कलमानुसार काढण्यांत आला आहे. ह्या हुकुमाचे चार भाग आहेत. पहिला भाग प्रास्ताविक असून दुसरा आणि तिसरा भाग पाकिस्तानाच्या नोटा काढणारी संस्था आणि पाकिस्तानाची मध्यवर्ती बँक म्हणून रिझर्व बँकेस मान्यता देणारा आहे. त्यामुळें रिझर्व बँक कायद्यांत ३० सप्टेंबर १९४८ अखेर अमलांत रहाणाऱ्या दुरुस्त्या होत आहेत. १ जुलै, १९४७ ते ३० सप्टेंबर, १९४८ ह्या मुदतीमधील रिझर्व बँकेच्या नफ्याची आणि बँकेच्या रिझर्वज् सोनें, स्टर्लिंग रोखे, रुपये इत्यादिंची वांटणी कशी व्हावी, हें वरील हुकुमाच्या चवथ्या भागांत स्पष्ट केलें आहे.

३० सप्टेंबर १९४८ अखेर रिझर्व्ह बँक हीच पाकिस्तानाची मध्यवर्ती बँक राहाणार आहे. पाकिस्तानानें दुसरें चलन ठरवीपर्यंत, रुपया हेंच त्याचें प्रमाण चलन राहील. तथापि, ३१ मार्च १९४८ नंतर पाकिस्तानाच्या कर्जाची व्यवस्था रिझर्व्ह बँक पाहाणार नाहीं आणि नवीन कर्जे उभारण्याचें किंवा हुंडणावळीचें काम पत्करणार नाहीं. पाकिस्तानास चलन आणि परदेशी हुंडणावळीबाबत स्वतःचें धोरण जितक्या लवकर अंमलांत आणतां येईल, तितकें त्यास हवें आहे. ३० सप्टेंबर १९४८ अखेर हिंदी नोटा पाकिस्तानांत चालू राहिल्या तरी १ एप्रिल १९४८ नंतर रिझर्व्ह बँक पाकिस्तानी चलनी नोटा काढू शकेल. ह्या नोटा फक्त पाकिस्तानांतच चालतील. हिंदी नाण्यांपेक्षा वेगळी नाणीं न काढण्याचें बंधन पाकिस्तानवर सप्टेंबर १९४८ अखेर आहे. पाकिस्तानांत शेड्युल्ड बँकांवर रिझर्व्ह बँकेची पूर्वीप्रमाणेंच देखरेख राहील. ३० सप्टेंबर नंतर मात्र त्यांच्यावर पाकिस्तान सरकारच्या कायद्याचें नियंत्रण येईल.

१ जुलै १९४७ ते ३० सप्टेंबर १९४८ ह्या मुदतीमधील जेवढा नफा मध्यवर्ती सरकारच्या वांट्यास जाईल, त्याची हिंदुस्थान सरकार व मध्यवर्ती सरकार ह्यांचेमध्यें वाटणी केली जाईल, आणि ती वाटणी चलनी नोटांच्या दोन्ही देशांतील प्रसाराचें प्रमाणांत होईल. बँकेच्या इश्यू खात्यांतील जिंदगीचा पाकिस्तानचा हिस्सा, तें सरकार किती नोटांच्या फेडीची जबाबदारी पत्करील ह्यावर अवलंबून राहील. रिझर्व बँकेची पाकिस्तानांतील मालमत्ता, रिझर्व्ह फंड, इत्यादींची वाटणी कशी व्हावयाची हेंहि ठरलें आहे. रिझर्व्ह बँक ३० सप्टेंबर १९४८ रोजीं लिक्विडेशनमध्यें गेली असें समजून, तिच्या जिंदगीचा व देण्याचा हिशेब केला जाईल व वाटणीचा व्यवहार संपविण्यांत येईल.

---

**आयुर्विमा फंडावरील व्याजाचा दर**—अमेरिकेंतील आयुर्विमा कंपन्यांच्या लाइफ अॅ. फंडावर पडणारा व्याजाचा दर सालोसाल उतरत आहे. १९४० सालीं तो ३·६१% होता. १९४५ सालीं तो ३·०७% झाला आणि १९४६ मध्यें तो २·९२% वर आला.

**रिझर्व्ह बँकेच्या हिशोबाचे तक्ते**—रिझर्व्ह बँकेच्या हिशोबाचे साप्ताहिक तक्ते वास्तविक शुक्रवार ता. १५ ऑगस्ट अखेर पुरे व्हावयाचे, परंतु ते फाळणीच्या सोईसाठी १४ ऑगस्ट अखेर पुरे करण्यांत आले.


# दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि०

हेड ऑफिसः—पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, बेलापूर रोड, ओझर ( जि. नाशिक ), खोपोली पे ऑफिसः

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | ... | रु. ७,९३,८१० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. ३,९६,२४५ |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ५५ लाखांवर |

चेअरमनः—श्री. के. वि. केळकर, M. A., LL. B. (वकील)

० गतवर्षी ऑर्डिनरी शेअर्सवर चार टक्के अधिक अर्धा टक्का करमाफ डिव्हिडंड दिलें.

० मुंबई, नगर, नाशिक, बंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे ठिकाणीं डिमांड ड्राफ्टस दिले जातात.

० बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

एन. एन. क्षीरसागर,
आर. बी. साळवेकर,
बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग डायरेक्टर्स.

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

मुख्य कचेरीः—लक्ष्मी रोड, पुणें.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवलः— | रु. | ५०,००,००० |
| खपलेलें भांडवलः— | रु. | ३२,००,००० |
| वसूल झालेलें भांडवलः— | रु. | १६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडः— | रु. | ३,९०,००० |
| एकूण खेळतें भांडवलः— | रु. | २,००,००,००० |

—:बोर्ड ऑफ डायरेक्टर्सः—

श्री. धों. कृ. साठे, (चेअरमन) श्री. वा. पुं. वर्दे (व्हा. चेअरमन)
श्री. न. गं. पवार, श्री.श्री. गो. मराठे, श्री.मा. रा. जोशी,
श्री. फ. दो. पदमजी, श्री. मा वि. शहा,
श्री. शं. ल. किर्लोस्कर, श्री. भा. म. गुप्ते,
श्री. मो. रा. ढमढेरे.

शाखाः—डेकन जिमखाना (पुणें), खडकी, मुंबई (फोर्ट), मुंबई ( गिरगांव ), नाशिक, चाळीसगांव, धुळें, जळगांव, फैजपूर ( पे. ऑफिस ), नागपूर ( सिताबर्डी ), नागपूर ( इतवारी ), रत्नागिरी, कोपरगांव, हुबळी, सोलापूर, कल्याण इ.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शिवाय ट्रस्टी आणि एक्झिक्यूटरचे व्यवहाराबाबत चौकशी करावी.

चिं. वि. जोग
मॅनेजर.

## साखर कारखाने व शेतकरी ह्यांचेमधील जमिनींच्या खंडाचे करार

### खंड वाढविण्याची पूर्व तयारी ?

साखर कारखान्यांनीं शेतकऱ्यांची जमीन खंडानें घेतलेली असते व तींत कारखाने ऊंस लावतात. " कित्येक कारखान्यांनीं अशा रीतीनें खंडानें जमीन घेतली आहे, परंतु कारखाने व शेतकरी ह्यांचेमध्ये ठरलेला खंड फार लहान आहे. तेव्हां कांहीं अटींवर ही जमीन शेतकऱ्यांस परत देण्यांत यावी. " अशा आशयाची मागणी मुंबई सरकारकडे करण्यांत आली आहे. साखर कारखान्यांनीं खंडाचे कायदेशीर करार केलेले असल्याकारणानें, शेतकऱ्यांस त्यांची जमीन परत देवविण्याचा सरकारचा मानस नाहीं. परंतु, शेतकऱ्यांस योग्य खंड मिळावा ह्या दृष्टीनें करारांची तपासणी करण्यासाठी मुंबई सरकारनें एक कमिटी नेमली आहे. साखर कारखान्यांनीं करारांतील अटी बदलण्यास मान्यता दिली तरच शेतकऱ्यांस ज्यास्त खंड मिळूं शकेल, हें उघड आहे. नाहीं तर, मुंबई कुळ कायद्याच्या २५ व्या कलमाचा आधार सरकारास घ्यावा लागेल. प्रस्तुत कमिटीचे चेअरमन मध्य भागाचे कमिशनर हे असून कारखानदारांचा एक व हितसंबंधी शेतकऱ्यांचा एक असे प्रतिनिधी कमिटीचे सभासद रहातील. कमिटीच्या कामाची मुदत तीन महिने आहे.

कमिटीकडे सोपविलेलीं कामें खालीलप्रमाणें आहेतः—( १ ) कारखान्यांनीं खंडानें घेतलेली जी जमीन उसाच्या लागवडीसाठी, फॅक्टरीच्या इमारतीसाठी किंवा इमारतीकडे नेणाऱ्या रस्त्यांसाठी वापरण्यांत येत नाहीं अशा जमिनींच्या खंडाची रकम पुरेशी आहे किंवा नाहीं आणि खंडाचिठ्ठींतील इतर अटी योग्य आहेत किंवा नाहींत हें पहाणें. (२) कारखानदार खंडाच्या करारांत दुरुस्ती करून रकम कितपत वाढविण्यास तयार आहेत ? ( ३ ) साखर कारखान्यांकडे खंडानें असलेल्या जमिनींस कुळ कायद्याचें कोणतेंहि कलम लावतां यावें ह्या दृष्टीनें सरकारनें कायद्याचें २५ वें कलम दुरुस्त करावें काय ?

---

### कामगारांचे कामाचे तास

आधुनिक यांत्रिक साधनांचा उपयोग करून उत्पादन कमी न होता, कामगारांचे कामाचे तास कमी करता येतात, ही गोष्ट ब्रिटनमधील या संबंधीच्या अनुभवावरून दिसून येते. १९१९ आणि १९२० सालीं ब्रिटनमधील ६८ लाख, ७२ हजार कामगारांचे कामाचे तास दर आठवड्यामागे ६ तासांनी कमी करण्यांत आले. सर्वसामान्यपणें कारखान्यांतून ४८ तासांचा आठवडा ठेवण्यांत आला. दुसऱ्या महायुद्धांत ब्रिटिश ट्रेड युनिअन कॉंग्रेस आणि तिला जोडण्यांत आलेल्या संस्था ह्यांनीं ४० तासांचा आठवडा करण्यांत यावा असा निर्णय घेतला. कामगारांच्या ह्या संघटनेनें कारखानदारांशीं जे करार केले आहेत त्यांत ४४ आणि ४५ तासांच्या आठवड्याला संमति देण्यांत आलेली आहे. कांहीं करारांतून ४२½ तासांचाही आठवडा ठेवण्यांत आलेला आहे. ऑगस्ट १९४५ पासून सुमारे ५५ लाख कामगारांचे कामाचे तास दर आठवड्याला सरासरी ३ तासांनीं कमी करण्यांत आले आहेत. सर्व उद्योगधंद्यांचा कामाचा सरासरी आठवडा ४४ तासांचा पडतो. तथापि, कामाचे तास कमी केल्यामुळें त्याच प्रमाणांत उत्पादन घटलें आहे असें मात्र नाहीं. पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धांच्या दरम्यानच्या काळांत नवीन शोध, नवीन यंत्रें, आणि उत्पादनाच्या नव्या पद्धति ह्यामुळें दर माणशी उत्पादनांत खूपच वाढ झालेली आहे.


# रामतीर्थ ब्राह्मी तेल



[ स्पेशल नं. १ ]
सर्वत्र मिळतो.

पांढरे केस काळे होतात. स्मरणशक्ति वाढते. टक्कलावर केंस उगवतात. शांत झोंप येते. दृष्टि सुधारते. केंस लांबसडक होतात. केसांची नीट निगा राखते. डोकेंदुखी थांबते.

मोठी बाटली रु. ३-८-०, लहान बाटली रु. २-०-०

रामतीर्थ योगाश्रम, ४४८ सॅण्ढर्स्ट रोड, मुंबई ४

---

# गोवर्धन डेअरी फार्म्स लि.

गोवर्धनवाडी, पुणें १

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

१ सरदार के. आर. त्रिंबूरकर, बी. ए., एलएल. बी., जहागिरदार, पुणें ( चेअरमन )
२ सरदार व्ही. डी. पानसे, जहागिरदार, पुणें.
३ श्रीमंत जी. व्ही. साळवेकर, बी. ए., मुंबई.
४ श्री. एस. एस. निसळ, जहागिरदार व बँकर, अहमदनगर.
५ श्री. एस. जी. लोंबार, मर्चंट, पुणें.
६ सरदार अमरसिंहराव कदम, पुणें.
७ रावसाहेब वाय. डी. खोले, पुणें. ( स्पेशल डायरेक्टर )
८ श्री. व्ही एस. सोलापूरकर, लँडलॉर्ड, पुणें. ( अधिकारपरत्वें )

—मॅनेजिंग एजंटस—

★ मेसर्स सोलापूरकर अँड डोणवाड ★

## कंपनीचीं वैशिष्ट्यें

★ कंपनीनें आधुनिक पद्धतीची यंत्रसामुग्री, ट्रॅक्टर वगैरे आणविलीं असून तिच्या सहाय्यानें शेतीचीं सर्व कामें करून घेणार आहेत.

★ कंपनीनें बाजारभाव सुमारें १ लक्ष रु. असलेली जमीन माफक किंमतीस मिळविली आहे.

★ कंपनीच्या डेअरीमध्यें फक्त गाई — सिंधी गाईच — आहेत.

★ पहिल्याच वर्षी कंपनीनें ६% व ३% डिव्हिडंड दिलें आहे.

### शेअर्स विकीस काढलेले आहेत.

डिपॉझिट रकमा स्वीकारल्या जातात.

| व्याजाचे दर— | १ वर्ष | २ वर्षें | ३ वर्षें |
|---|---|---|---|
| | ४% | ५% | ६% |

—अधिक माहितीसाठी चौकशी करावी—

मॅनेजिंग एजंटस


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा प. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.